सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## (दोन)

## २०२३-२०२४

## नियोजन विभाग
## (अर्थ व सांख्यिकी संचालनालय)

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## (दोन)

## २०२३-२०२४

**नियोजन विभाग**
**(अर्थ व सांख्यिकी संचालनालय)**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना .. .. .. | ०१ |
| | एकूण अर्थसंकल्पाचा कार्यक्रमानुसार गोषवारा २०२२-२०२३ | ०२ |
| | एकूण अर्थसंकल्पाचा प्रधान शीर्षवार तपशील .. .. .. | ०४ |
| | कार्यक्रम - | |
| २. | मार्गदर्शन, प्रशासन व प्रशिक्षण .. .. .. | ०६ |
| ३. | कार्यालयीन आकडेवारी .. .. .. | ११ |
| ४. | नियोजनाकरिता आकडेवारी .. .. .. | १७ |
| ५. | पाहण्या, अभ्यास व गणना .. .. .. | ३० |
| ६. | मूल्यमापन अभ्यास .. .. .. | ३७ |
| ७. | आकडेवारी संस्करण .. .. .. | ४१ |
| ८. | **परिशिष्टे -** | |
| | परिशिष्ट - १ - कर्मचारी विषयक गोषवारा .. .. .. | ५० |
| | परिशिष्ट - २ कर्मचारी विषयक गोषवारा (संचालनालयाबाहेरील पदे) .. .. | ५२ |
| | परिशिष्ट - ३ अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची रचना .. .. .. | ५३ |
| | परिशिष्ट - ४ मा. अर्थ व सांख्यिकी संचालक ज्या समित्यांवर सभासद / आमंत्रित आहेत अशा समित्यांची यादी .. .. .. | ५४ |
| | परिशिष्ट - ५ अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून प्रकाशित करण्यात येणारी प्रकाशने, कालावधी, प्रकाशनाचे वर्ष व मूल्य दर्शविणारे विवरणपत्र.. | ५७ |

# १. प्रस्तावना

१.१ राज्य शासनाने १९८९-९० या वर्षी राज्यातील सर्व सांख्यिकीय बाबींसाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयास 'प्रमुख संस्था' (नोडल एजन्सी) म्हणून घोषित केले व सर्व प्रकारच्या सांख्यिकी प्रस्तावांसाठी 'संदर्भ संस्था' (ॲथॉरिटी ऑफ रेफरन्स) म्हणूनही या संचालनालयास प्राधिकृत केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांक २७ जून, २०१३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्य शासनाने राज्यातील सर्व सांख्यिकीय बाबींशी संबंधित तांत्रिक समन्वयासाठी आणि कार्यक्षम सांख्यिकीय प्रणालीच्या विकासासाठी 'प्रमुख संस्था' (नोडल एजन्सी) म्हणून संचालनालयाच्या कार्यकक्षेत वाढ केली आहे. प्रमुख संस्था या नात्याने संचालनालयाकडे पुढील जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. राज्यातील निरनिराळ्या शासकीय विभागांच्या / संस्थांच्या सांख्यिकीय कामकाजात समन्वय साधणे, निरनिराळ्या धोरणात्मक क्षेत्रांविषयी आवश्यक असणारी माहिती तयार करणे, जतन करणे आणि राज्याच्या वेगवेगळया शासकीय विभागांकडील माहिती सारणीचा दर्जा, व्याप्ती, नियमितता व विश्वासार्हता यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनेबद्दल सूचना करणे, विविध शासकीय विभागांमार्फत हाती घेण्यात येणाऱ्या सांख्यिकीय प्रकल्पांची उद्देशानुसार व सांख्यिकीय निकषांनुसार छाननी करणे, राज्याच्या विविध शासकीय विभागांच्या माहितीचे एकाच ठिकाणी एकत्रिकरण करण्याच्या दृष्टीने राज्य माहिती संचयिका विकसित करणे, शासनाचे विविध विभाग, संशोधक, स्वयंसेवी संस्था व सामान्य जनता यांना सांख्यिकीय माहिती सहजपणे उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ती कार्यप्रणाली विकसित करुन कार्यान्वित करणे. राज्यातील प्रमुख सांख्यिकीय कार्यालय असल्यामुळे सांख्यिकीय बाबींसाठी राज्य आणि केंद्र शासन यांच्यातील दुवा म्हणून हे संचालनालय काम पाहते.

१.२ संचालनालयाच्या कामामध्ये पुढील प्रमुख बाबींचा समावेश आहे : १) कार्यालयीन आकडेवारीचे संकलन, २) ज्या विषयांसंदर्भात कार्यालयीन आकडेवारी अपुरी आहे अशा विषयांसंबंधीची माहिती नमुना पाहणी / अभ्यास किंवा गणना याद्वारे गोळा करणे, ३) महत्त्वाच्या कार्यक्रमांचे मूल्यमापन अभ्यास घेणे, ४) नियमित सांख्यिकीय प्रकाशने प्रसिद्ध करणे, ५) सांख्यिकी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, ६) शासनाच्या निरनिराळया विभागातील सांख्यिकीय कक्षांच्या कामांचे समन्वयन करणे व त्यांना तांत्रिक सल्ला देणे, ७) शासनास आर्थिक व सांख्यिकीय बार्बीवर सल्ला देणे ८) शाश्वत विकास ध्येयांची अंमलबजावणी व समन्वयन करणे आणि ९) या संचालनालयामार्फत तसेच इतर शासकीय विभागात गोळा करण्यात येणाऱ्या सांख्यिकीय माहितीचे संस्करण / विश्लेषण करणे.

१.३ या संचालनालयाद्वारे पार पाडल्या जाणाऱ्या कामाची विभागणी प्रामुख्याने खालील सहा कार्यक्रमांमध्ये केली आहे. या कार्यक्रमांचा खर्च 'आर्थिक सल्ला व सांख्यिकी' या प्रधान शीर्षाखालील अर्थसंकल्पीय अनुदानातून भागवून हे कार्यक्रम पार पाडले जातात. या कार्यक्रमांचा तपशील पुढील भागात या प्रकाशनात देण्यात आला आहे.

कार्यक्रम :

(१) मार्गदर्शन, प्रशासन व प्रशिक्षण
(२) कार्यालयीन आकडेवारी
(३) नियोजनाकरीता आकडेवारी
(४) पाहण्या, अभ्यास व गणना
(५) मूल्यमापन अभ्यास
(६) आकडेवारी संस्करण

# विवरणपत्र 'अ'
## एकूण अर्थसंकल्पाचा कार्यक्रमानुसार गोषवारा २०२३-२४

(रुपये हजारात)

| अ.क्र. Sr.No. | कार्यक्रम | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महसुली Revenue | भांडवली Capital | एकूण Total | महसुली Revenue | भांडवली Capital | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1) | **मार्गदर्शन, प्रशासन व प्रशिक्षण** | | | | | | |
| | अनिवार्य | 30555 | 0 | 30555 | 45782 | 0 | 45782 |
| | कार्यक्रम | 229 | 0 | 229 | 13401 | 0 | 13401 |
| | एकूण | 30784 | 0 | 30784 | 59183 | 0 | 59183 |
| 2) | **कार्यालयीन आकडेवारी** | | | | | | |
| | अनिवार्य | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| | कार्यक्रम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| 3) | **योजनाविषयक आकडेवारी** | | | | | | |
| | अनिवार्य | 297178 | 0 | 297178 | 395989 | 0 | 395989 |
| | कार्यक्रम | 29166 | 0 | 29166 | 93931 | 0 | 93931 |
| | एकूण | 326344 | 0 | 326344 | 489920 | 0 | 489920 |
| 4) | **पाहण्या, अभ्यास व गणना** | | | | | | |
| | अनिवार्य | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| | कार्यक्रम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| **5)** | **मूल्यमापन अभ्यास** | | | | | | |
| | अनिवार्य | 39169 | 0 | 39169 | 55591 | 0 | 55591 |
| | कार्यक्रम | 2 | 0 | 2 | 10885 | 0 | 10885 |
| | एकूण | 39171 | 0 | 39171 | 66476 | 0 | 66476 |
| **6)** | **आकडेवारी संस्करण** | | | | | | |
| | अनिवार्य | 41719 | 0 | 41719 | 58645 | 0 | 58645 |
| | कार्यक्रम | 42918 | 0 | 42918 | 108084 | 0 | 108084 |
| | **एकूण** | **84637** | **0** | **84637** | **166729** | **0** | **166729** |
| | एकूण स्थूल | 599945 | 0 | 599945 | 957592 | 0 | 957592 |
| | वजा वसुली | 245 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | एकूण निव्वळ | 599700 | 0 | 599945 | 957592 | 0 | 957592 |

## STATEMENT 'A'

### Activitywise Summary of Budget Estimates 2023-24

(Rs. in thousand)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ Revised Estimates 2022-2023 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ Budget Estimates 2023-2024 | | | Name of Programme |
|---|---|---|---|---|---|---|
| महसुली Revenue | भांडवली Capital | एकूण Total | महसुली Revenue | भांडवली Capital | एकूण Total | |
| (9) | (10) | (11) | (12) | (13) | (14) | (2) |
| | | | | | | **Direction, Administration and Training** |
| 32693 | 0 | 32693 | 45861 | 0 | 45861 | Committed |
| 8332 | 0 | 8332 | 115500 | 0 | 115500 | Scheme |
| 41025 | 0 | 41025 | 161361 | 0 | 161361 | Total |
| | | | | | | **Official Statistics** |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Committed |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Scheme |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total |
| | | | | | | **Statistics for Schemening** |
| 393470 | 0 | 393470 | 428788 | 0 | 428788 | Committed |
| 55527 | 0 | 55527 | 128890 | 0 | 128890 | Scheme |
| 448997 | 0 | 448997 | 557678 | 0 | 557678 | Total |
| | | | | | | **Surveys, Studies and Census** |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Committed |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Scheme |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total |
| | | | | | | **Evaluation Studies** |
| 51994 | 0 | 51994 | 61127 | 0 | 61127 | Committed |
| 9522 | 0 | 9522 | 20841 | 0 | 20841 | Scheme |
| 61516 | 0 | 61516 | 81968 | 0 | 81968 | Total |
| | | | | | | **Data Processing** |
| 52939 | 0 | 52939 | 63347 | 0 | 63347 | Committed |
| 72410 | 0 | 72410 | 93800 | 0 | 93800 | Scheme |
| **125349** | **0** | **125349** | **157147** | **0** | **157147** | **Total** |
| 796591 | 0 | 796591 | 1135838 | 0 | 1135838 | Total Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 796591 | 0 | 796591 | 1135838 | 0 | 1135838 | Total Net |

## विवरणपत्र 'ब'
## एकूण अर्थसंकल्पाचा प्रधान शीर्षवार तपशील

(रुपये हजारात)

| अ.क्र. Sr.No. | कार्यक्रम | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| | **प्रधान शीर्ष ३४५४** | | | | | | |
| 1) | **मार्गदर्शन, प्रशासन व प्रशिक्षण** | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| 2) | **कार्यालयीन आकडेवारी** | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| 3) | **योजनाविषयक आकडेवारी** | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| 4) | **पाहण्या, अभ्यास व गणना** | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| 5) | **मूल्यमापन अभ्यास** | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| 6) | **आकडेवारी संस्करण** | 41719 | 42918 | 84637 | 58645 | 108084 | 166729 |
| | एकूण स्थूल | 527630 | 72315 | 599945 | 731291 | 226301 | 957592 |
| | वजा वसुली | 245 | 0 | 245 | 0 | 0 | 0 |
| | एकूण निव्वळ | 527385 | 72315 | 599700 | 731291 | 226301 | 957592 |

## STATEMENT 'B'
## Major Headwise details of Total Budget Estimates

(Rs. in thousand)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Revised Estimates 2022-2023 | | | Budget Estimates २०२३-२०२४ | | | Name of Programme |
| अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | |
| Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | |
| (9) | (10) | (11) | (12) | (13) | (14) | (2) |
| | | | | | | **Major Head - 3454** |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | **Direction, Administration and Training** |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | **Official Statistics** |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | **Statistics for Planning** |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | **Surveys, Studies and Census** |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | **Evaluation Studies** |
| 52939 | 72410 | 125349 | 63347 | 93800 | 157147 | **Data Processing** |
| 650800 | 145791 | 796591 | 776807 | 359031 | 1135838 | Total Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 650800 | 145791 | 796591 | 776807 | 359031 | 1135838 | Total Net |

## २. मार्गदर्शन, प्रशासन व प्रशिक्षण

२.१ संचालनालयाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. मुख्य कार्यालयातील काम प्रशासन, प्रशिक्षण, समन्वय, राष्ट्रीय नमुना पाहणी, राष्ट्रीय उत्पन्न, अर्थ, मूल्यमापन आणि इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण केंद्र या विभागांत विभागण्यात आले असून या विभागांचे प्रमुख वरिष्ठ स्तरावरील अधिकारी आहेत. पाहणी, अभ्यास वगैरे कामांची आखणी व रचना, त्याचप्रमाणे अंमलबजावणी करणे, हाती घेतलेल्या वेगवेगळ्या पाहण्या आणि अभ्यासांवर आधारीत अहवाल शासनास सादर करणे, आर्थिक व सामाजिक सांख्यिकीचे संकलन करुन विश्लेषण करणे, सांख्यिकी पाहण्या / अभ्यासांचे अहवाल प्रकाशित करणे ही कामे संचालनालयाच्या मुख्य कार्यालयामध्ये केली जातात. तसेच शासनाला विविध आर्थिक व सांख्यिकीय बाबींविषयी सल्ले दिले जातात. राज्य व केंद्र शासनाकडून नेमल्या गेलेल्या विविध समित्यांवर संचालक हे सभासद अथवा निमंत्रित म्हणून काम करतात. अशा समित्यांची यादी परिशिष्ट-४ मध्ये दिली आहे.

२.२ संचालनालयाची सहा प्रादेशिक कार्यालये असून त्या प्रादेशिक कार्यालयांचे प्रमुख सह संचालक आहेत. राज्यात एकूण ३६ जिल्हा सांख्यिकी कार्यालये कार्यरत आहेत. संचालनालयाची क्षेत्र कार्यालये म्हणून जिल्हा सांख्यिकी कार्यालये काम पाहतात. त्यामुळे मुख्य कार्यालयामधील विभागांच्या कामाप्रमाणेच प्रादेशिक व जिल्हा कार्यालयांत कामे केली जातात. या संचालनालयाचे विभागीय स्तरावरील छोटे प्रतिरुप म्हणून प्रादेशिक कार्यालयांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्याचे धोरण आहे. त्या दृष्टीने प्रादेशिक कार्यालयांवर स्वतंत्रपणे काही अभ्यास, पाहण्या व विश्लेषण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

२.३ सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ च्या कलम ३३ खाली तयार करण्यात आलेल्या सांख्यिकी संग्रहण नियम, २०११ मधील नियम ३, उपनियम (२) अनुसार प्रदान केलेल्या शक्तीनुसार महाराष्ट्र शासनाने या नियामाखाली अधिकार व कर्तव्ये बजावण्याकरिता संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना ‘नोडल ऑफीसर’ म्हणून घोषित केले आहे.

२.४ शासनाच्या काही विभागांमध्ये सांख्यिकी कक्ष अस्तित्वात असून सदर विभागांत सांख्यिकीय माहिती निर्माण होत असते. सदर विभागांतील माहिती संचालनालयाची विविध प्रकाशने, वेगवेगळ्या अभ्यास पाहण्या तसेच शासनाला आवश्यकतेनुसार विविध बैठकींकरीता आवश्यक असते. याअनुषंगाने ‘सांख्यिकी संग्रहण अधिनियम २००८’ आणि ‘सांख्यिकी संग्रहण नियम २०११’ अन्वये इतर विभागांनी सदर सांख्यिकीय माहिती अर्थ व सांख्यिकी संचालनालयास उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

२.५ संचालनालयाची रचना दर्शविणारा तक्ता परिशिष्ट-३ मध्ये दिला आहे.

२.६ मागील काही वर्षांत राज्यातील सांख्यिकीय माहितीची गरज वाढली असून त्यानुसार शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांनी सांख्यिकीय कक्ष निर्माण केले आहेत. विविध विभागांतील सांख्यिकीय कामांमध्ये एकसुत्रता आणण्याच्या दृष्टीने व सांख्यिकीय कामांत समन्वय साधण्याच्या दृष्टीने शासनाने राज्यातील सर्व सांख्यिकीय बाबींसाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयास ‘प्रमुख संस्था’ म्हणून घोषित केले आहे. सर्व प्रकारच्या सांख्यिकीय प्रस्तावांसाठी ‘संदर्भ संस्था’ म्हणून सुद्धा अर्थ व सांख्यिकी संचालनालयास प्राधिकृत करण्यात आले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याकरिता अपर संचालक (समन्वय) या वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्याचे पद १९९२-९३ मध्ये निर्माण करण्यात आले आहे. ‘प्रमुख संस्था’ या अनुषंगाने निरनिराळया विभागातल्या सांख्यिकी कक्षांच्या कामकाजाचा आढावा घेणे व सांख्यिकीय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे ही कामे नियमितपणे चालणारी आहेत.

२.७ संचालनालयातील अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी तसेच बाह्य संस्थांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणास पाठविण्यासाठी १९७९-८० मध्ये संचालनालयात प्रशिक्षण शाखेची स्थापना करण्यात आली. सांख्यिकी सहायक आणि लिपिक-टंकलेखक / अन्वेषक यांचेसाठी विहित केलेल्या विभागीय सेवाप्रवेशोत्तर परिक्षांसाठी प्रशिक्षण सत्र आयोजित करणे व परीक्षा घेणे हे या शाखेचे प्रमुख काम आहे. शा.नि.क्र.टीआरएन-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि. २३ सप्टेंबर, २०११ च्या राज्य प्रशिक्षण धोरणानुसार राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड च्या अधिकारी / कर्मचारी यांना पायाभूत, पदोन्नतीनंतरचे, उजळणी, बदलीनंतरचे, नवीन विषयाची तोंड ओळख याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येते. याशिवाय संचालनालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना तांत्रिक, प्रशासकीय व कार्यालयीन कामाची परिपूर्ण माहिती करुन देण्याच्या दृष्टीने इतर शासकीय संस्थांनी वेळोवेळी आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी / कार्यशाळांसाठी नामनिर्देशन व अनुषंगिक कार्यवाही प्रशिक्षण शाखेमार्फत करण्यात येते.

२.८ सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये प्रशिक्षण शाखेने केलेल्या कामाची माहिती सोबत दिलेल्या तक्ता क्रमांक २.२ मध्ये दिली आहे.

२.९ सन २०२३-२४ मध्ये मागील वर्षाप्रमाणेच प्रशिक्षणाची कामे करण्यात येतील. तसेच महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणानुसार संचालनालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना यशदा या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच ‘सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य’ या केंद्रीय क्षेत्र योजने अंतर्गत संचालनालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे क्षमतावर्धन अंतर्गत निरनिराळया विषयांवरील प्रशिक्षणे / कार्यशाळा आयोजित करण्यात येतील.

## तक्ता २.१
## वित्तीय आवश्यकता

(रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण-** | | | | | | |
| मार्गदर्शन, प्रशासन व प्रशिक्षण | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| एकूण 'अ' स्थूल | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'अ' निव्वळ | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण-** | | | | | | |
| वेतन | 28221 | 0 | 28221 | 41424 | 0 | 41424 |
| अतिकालीक भत्ता | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 7 |
| मजूरी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| प्रवास खर्च | 42 | 0 | 42 | 332 | 0 | 332 |
| कार्यालयीन खर्च | 1142 | 0 | 1142 | 1365 | 1 | 1366 |
| दुरध्वनी, वीज व पाणी शुल्क | 1076 | 0 | 1076 | 2521 | 0 | 2521 |
| इतर प्रशासकीय खर्च | 0 | 229 | 229 | 0 | 5900 | 5900 |
| पेट्रोल, तेल व वंगन | 74 | 0 | 74 | 112 | 0 | 112 |
| व्यावसायिक व विशेष सेवा | 0 | 0 | 0 | 20 | 0 | 20 |
| शिष्यवृत्या व विद्यावेतने | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कंत्राटी सेवा | 0 | 0 | 0 | 0 | 1000 | 1000 |
| इतर खर्च | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| संगणक खर्च | 0 | 0 | 0 | 0 | 6500 | 6500 |
| इतर खर्च (भारित) | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| एकूण 'ब' स्थूल | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'ब' निव्वळ | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने-** | | | | | | |
| मागणी क्र. प्रधान शीर्ष | | | | | | |
| ओ -९ ३४५४ | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| एकूण 'क' स्थूल | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'क' निव्वळ | 30555 | 229 | 30784 | 45782 | 13401 | 59183 |

**TABLE २.१**
**Financial Requirements**

(Rs in thousands)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Revised Estimates 2022-2023 | | | Budget Estimates 2023-2024 | | | Classification |
| अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | |
| Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | |
| (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) | (1) |
| | | | | | | **Activitywise Classification --** |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Direction, Administration and Training |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Total "A" Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Total 'A' Net |
| | | | | | | **Objectwise Classification** |
| 28837 | 0 | 28837 | 41424 | 0 | 41424 | Salaries |
| 6 | 0 | 6 | 21 | 0 | 21 | Over time allowance |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Wages |
| 233 | 0 | 233 | 333 | 6000 | 6333 | Travel expenses |
| 1229 | 1 | 1230 | 1416 | 9200 | 10616 | Office expenses |
| 2269 | 0 | 2269 | 2521 | 200 | 2721 | Telephone, Electricity & Water Charges |
| 0 | 4130 | 4130 | 0 | 28500 | 28500 | Other administrative expenses |
| 101 | 0 | 101 | 125 | 0 | 125 | Petrol,Oil & Lubricicants |
| 17 | 0 | 17 | 20 | 5000 | 5020 | Professional & Special Services |
| 0 | 0 | 0 | 0 | 54000 | 54000 | Scholarship / Stipend |
| 0 | 1 | 1 | 0 | 3100 | 3100 | Contractual Services |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Other charges |
| 0 | 4200 | 4200 | 0 | 9500 | 9500 | Computers Expenses |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Other charges (charged) |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Total 'B' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Total 'B' Net |
| | | | | | | **Source of Finance** |
| | | | | | | Demand No. Major Head |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | O-9 3454 |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Total 'C' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 32693 | 8332 | 41025 | 45861 | 115500 | 161361 | Total 'C' Net |

## तक्ता २.२ TABLE 2.2

### कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश व वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरण

### Programme work-load summary and explanation of financial requirements

| अ.क्र. Sr.No. | कार्य / बाब वर्णन | कामाच्या मोजमापाचे परिमाण | केलेले काम Work done during २०२१-२२ 2021-22 | २०२२-२३ 2022-23 | करावयाचे काम Work proposed during २०२३-२४ 2023-24 | Unit of Work Measurement | Activity / Item Description |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| (१) | सांख्यिकी व प्रशासकीय काम- (संचालनालयातील पदे) | कर्मचाऱ्यांची संख्या | 995 | 995 | 849+147* | No. of Employees | Statistical and Administrative work (Post in Directorate) |
| (२) | सांख्यिकी काम (संचालनालयाबाहेरील पदे) | कर्मचाऱ्यांची संख्या | 904 | 908 | 905 | No. of Employees | Statistical work (Post Out of Directorate) |
| (३) | कार्यालयाची तपासणी- | | | | | | Office Inspection |
| | (अ) प्रादेशिक कार्यालयाकडून जिल्हा कार्यालयांची | संख्या | 36 | 26 | 36 | No. | Of District Offices by Regional Offices |
| | (ब ) मुख्य कार्यालयाकडून प्रादेशिक कार्यालयांची | संख्या | 3 | 3 | 6 | No. | Of Regional Offices by Head Office |
| | (क) मुख्य कार्यालयाकडून जिल्हा सांख्यिकी कार्यालयांची | संख्या | 2 | 3 | 6 | No. | Of District Offices by Head Offices |
| (४) | प्रशिक्षण वर्ग- | | | | | | Training Courses - |
| | (अ) सांख्यिकी सहाय्यकांकरिता | तुकडी (संख्या) | 1# | 1## | 4 | Batch (No.) | For Statistical Assistant |
| | (ब) लिपिक टंकलेखक / अन्वेषक | तुकडी (संख्या) | 1# | 1## | 1 | Batch (No.) | For Clerk Typist / Investigator |
| | (क) निरनिराळया संस्थांकडे प्रशिक्षणासाठी पाठविलेले प्रशिक्षणार्थी / राज्य प्रशिक्षण धोरण २०११ अंतर्गत | सत्र (संख्या) | 17 | 6 | 16 | Courses (No.) | No. of trainees sent for training in different Institutions / under state training policy-2011 |
| | (ड) इतर विभागातील सांख्यिकी विषयक कामकाजाबाबतचे प्रशिक्षण | सत्र (संख्या) | - | - | 2 | | Trainnings related to statistical work done in other department |
| | | प्रशिक्षणार्थी संख्या | 633 | 206 | 1115 | Trainees No. | |

# सन २०२०-२१ मधील अनुत्तीर्ण / अनुपस्थित परीक्षार्थींकरीता परीक्षा आयोजित करण्यात आली.

## सन २०२१-२२ मधील अनुत्तीर्ण / अनुपस्थित परीक्षार्थींकरीता परीक्षा आयोजित करण्यात आली.

* बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाची सेवा/Outsourcing Services

## ३. कार्यालयीन आकडेवारी

३.१ या कार्यक्रमामध्ये विविध संस्थांकडून कार्यालयीन आकडेवारी गोळा करुन एकत्रित करणे, विविध सांख्यिकीय प्रकाशने तयार करणे आणि संचालनालयाच्या ग्रंथालयाचे व्यवस्थापन करणे या कामांचा समावेश होतो.

३.२ संचालनालय दरवर्षी तयार करीत असलेल्या प्रकाशनांची नावे पुढे दिली आहेत. प्रथमत: ज्या वर्षासाठी प्रकाशने प्रसिध्द करण्यात आली, ती वर्षे कंसामध्ये दर्शविली आहेत.

१) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा (१९५१-५२)
२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (१९६१-६२)
३) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी (१९६०)
४) महाराष्ट्राची आर्थिक आकडेवारी (१९७५)
५) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (१९५७-५८)
६) महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे व भारतातील राज्यांचे निवडक ८१ निर्देशक (१९८२-८३)
७) पायाभूत सुविधांबाबतची महाराष्ट्र राज्याची सांख्यिकी (२०१२-१३) (द्विवार्षिक)

३.३ या प्रकाशनांमध्ये विविध विषयांची कार्यालयीन आकडेवारी तसेच संचालनालयाने घेतलेल्या अभ्यास व पाहण्या यांचे अहवाल आणि गोळा केलेली माहिती यांचा समावेश असतो. संचालनालयाची प्रमुख सांख्यिकीय प्रकाशने संचालनालयाच्या https://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. संचालनालयाकडून प्रकाशित करण्यात येणाऱ्या प्रकाशनांचा तपशील परिशिष्ट-५ मध्ये देण्यात आला आहे.

३.४ प्रकाशनांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (३०० पृष्ठे)** : सन १९६१-६२ पासून अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन कालबद्ध वेळापत्रकानुसार दरवर्षी तयार करते. राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी सदर प्रकाशन सादर करण्यात येते. याबाबत महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, खंड पहिला यामधील परिच्छेद क्र. १३८ व १३९ (दोन) आर्थिक आढावा यामध्ये सदर प्रकाशन अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने तयार करण्याबाबत नमुद केलेले आहे. सदर प्रकाशन मराठी व इंग्रजी भाषेमध्ये स्वतंत्र तयार करण्यात येते. या प्रकाशनात राज्याच्या अर्थव्यवस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये, विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची सांख्यिकीय आकडेवारी व संदर्भासाठी शक्य त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात येतात. सदर प्रकाशन महाराष्ट्र राज्याच्या महत्त्वाच्या सांख्यिकीची समयमालिकानिहाय अद्ययावत माहिती आणि भारतातील सर्व राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक उपलब्ध करुन देते. अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्याच्या प्रयत्नामुळे सदर प्रकाशनात समाविष्ट केलेली काही माहिती / आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरुपातील असतात. या प्रकाशनासाठी एकूण अंदाजे २५४ कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व खाजगी संस्था यांच्याकडून माहिती मागविण्यात येते. या प्रकाशनात एकूण १० मुख्य (१७ उपप्रकरणे) प्रकरणे समाविष्ट असून सदर प्रकरणांचे लेखन संचालनालयातील अधिकाऱ्यांमार्फत केले जाते. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३ हे प्रकाशन प्रकाशित झाले आहे. सन २०२३-२४ साठीचे प्रकाशन संबंधित वर्षात प्रकाशित करण्यात येईल.

**२. महाराष्ट्राची आर्थिक आकडेवारी (१० पृष्ठे)** : राज्यातील काही महत्त्वाच्या विकास क्षेत्रातील आकडेवारी या प्रकाशनात प्रकाशित केली जाते. २४ बाबींवरील संक्षिप्त माहिती प्रकाशित करण्यात येते. सदर प्रकाशन १९७८ पासून प्रकाशित होत आहे. या छोटेखानी पुस्तिकेत राज्याच्या अर्थव्यवस्थेतील निवडक आर्थिक बाबींची दशवार्षिक तुलनात्मक माहिती प्रकाशित केली जाते. सन २०२१ साठीचे

सदर प्रकाशन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाले आहे.

**३. महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी (२१४ पृष्ठे)** : राज्याच्या विकास क्षेत्रांबाबतची महत्त्वाची संक्षिप्त सांख्यिकी (१३१ तक्ते) प्रकाशित करणे. सन १९६१ पासून प्रकशित होणाऱ्या या प्रकाशनात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व आर्थिक बाबींची संदर्भ वर्षाची संक्षिप्त माहिती सांख्यिकीय तक्त्यात अंतर्भुत केली जाते. यामध्ये प्रथम टप्प्यात भारत व महाराष्ट्राची तुलनात्मक माहिती दिली जाते व शेवटच्या टप्प्यात आर्थिक व सामाजिक प्रगतीचे कल निवडक निर्देशकाद्वारे दाखविले जातात. सन २०१९ साठीचे सदर प्रकाशन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाले आहे.

**४. महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा (६२३ पृष्ठे)** : या प्रकाशनात आर्थिक व सामाजिक बाबींवरील जिल्हानिहाय तक्ते प्रकाशित करण्यात येतात. या प्रकाशनात एकूण ३३ प्रकरणे असून निरनिराळ्या विषयांवरील २५६ तक्ते आहेत. उदा. लोकसंख्या, हवामान, शेती, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, रोजगार, उद्योग, किंमती, व्यापार, सहकार, बँका व योजना, आरोग्य, शिक्षण, स्थानिक संस्था, लोकवित्त, राज्य उत्पन्न इ. अंदाजे ९१ संस्था/कार्यालये यांजकडून या प्रकाशनासाठी माहिती मागविण्यात येते. तसेच अंदाजे ४४ तक्त्यांची माहिती विविध यंत्रणांच्या संकेतस्थळावरुन संकलित केली जाते. महाराष्ट्र व भारत यांच्या माहितीवर आधारित काही बाबींबाबत तुलनात्मक तक्ते व सारांश तक्त्यांचाही समावेश या प्रकाशनात करण्यात येतो. ह्या प्रकाशनामधील माहिती जिल्हावार आहे. सन २०१७-१८ साठीचे सदर प्रकाशन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाले आहे.

**५. महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे व भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक (४३ पृष्ठे)** : महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे १४२ निर्देशक व भारतातील राज्यांचे ११८ निर्देशक प्रकाशित करण्यात येतात. वर्ष १९८२-८३ पासून प्रकाशित होणाऱ्या या प्रकाशनात महाराष्ट्रातील जिल्हयांचे आणि भारतातील राज्यांचे लोकसंख्या, कृषि, पशुधन, सहकारी संस्था, जिल्हापरिषदांचे उत्पन्न व खर्च, शिक्षण, उद्योग, वैदयकीय क्षेत्र अशा प्रमुख मूलभूत सुविधा व सेवा विषयक बाबींचे निवडक निर्देशक देण्यात येतात. सन २०१८-१९ साठीचे सदर प्रकाशन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाले आहे.

**६. महाराष्ट्राची पायाभूत सुविधा सांख्यिकी (द्वैवार्षिक)(१०२ पृष्ठे)** : राज्यातील पायाभूत सुविधांविषयक सांख्यिकी प्रकाशन, केंद्रीय सांख्यिकी संघटनेने तयार केलेल्या ‘Infrastructure Statistics २०१०’ या प्रकाशनावर आधारित ‘महाराष्ट्राची पायाभूत सुविधांविषयक सांख्यिकी’ हे द्वैवार्षिक सांख्यिकी प्रकाशन तयार करण्यात येते. या प्रकाशनात प्रामुख्याने जिल्हानिहाय माहिती हा पाया (Base) गृहित धरण्यात आला आहे. सदर प्रकाशनात जिल्हानिहाय माहिती समाविष्ट करुन राज्य स्तरावरील प्रकाशन तयार करण्यात येते. या प्रकाशनात राज्यातील सामाजिक पायाभूत सुविधांमधील परिवहन, ऊर्जा, दळणवळण, सिंचन, पिण्याचे पाणी पुरवठा आणि स्वच्छता, साठवण, शिक्षण व आरोग्य या आठ क्षेत्रांची राज्य स्तरावरील पायाभूत सांख्यिकीय माहिती संकलित केलेली आहे. सन २०१९-२० व २०२०-२१ साठीचे सदर द्वैवार्षिक प्रकाशन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित झाले आहे.

**७. आदिवासी सामाजिक व आर्थिक सांख्यिकी** : हे मराठी भाषेतील विभागनिहाय प्रकाशन तीन वर्षातून एकदा प्रकाशित करण्यात येते. त्यानुसार हे प्रकाशन २००६-०७ या वर्षाकरिता प्रकाशित करण्यात आले आहे. त्यानंतर सन २००९-१० या वर्षात आदिवासी सामाजिक व आर्थिक सांख्यिकी, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या प्रकाशनात एकत्रितरित्या जिल्हानिहाय प्रकाशित केले आहे. तथापि, २०१०-११

या वर्षापासून पुन:श्च 'आदिवासी सामाजिक व आर्थिक सांख्यिकी' स्वतंत्रपणे विभागनिहाय प्रकाशित करण्यात आले आहे. वर्ष २०१३-१४ साठी सदर प्रकाशन प्रकाशित करण्यात आले आहे.

८. **जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन** : सन १९५७-५८ मध्ये जिल्हा सांख्यिकी कार्यालयांची स्थापना झाल्यापासून प्रतिवर्षी '**जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन**' हे प्रकाशन जिल्हा सांख्यिकी कार्यालयांमार्फत प्रकाशित करण्यात येत आहे. या प्रकाशनात जिल्ह्यातील विविध सामाजिक व आर्थिक विषयांवरील तालुकानिहाय आकडेवारी दिली जाते. सन २००९-१० मध्ये सदर प्रकाशनाची पुनर्रचना करण्यात येऊन पुनर्रचित प्रकाशन सन २०१० मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये सदर प्रकाशनाची पुनश्च: पुनर्रचना करण्यात आली. सन २०२१ व सन २०२२ साठी सर्व जिल्ह्यांचे प्रकाशन प्रकाशित झाले आहे. सन २०२३ चे प्रकाशन संबंधित वर्षात प्रकाशित करण्यात येईल.

३.५ शासनाच्या इतर विभागांत संचालनालयाच्या संवर्गावरील अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत. सदर विभागांत सांख्यिकीय माहिती तयार होत असते. सदर सांख्यिकीय माहिती शासनास विविध धोरणात्मक निर्णय घेण्याकरीता उपयुक्त असल्याने संबंधित विभागांकडून सांख्यिकीय माहिती, प्रकाशने/अहवाल उपलब्ध करुन देण्यात येतात.

**तक्ता ३.१**
**वित्तीय आवश्यकता**

(रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण-** | | | | | | |
| मूलभुत आकडेवारी | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| एकूण 'अ' स्थूल | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'अ' निव्वळ | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण-** | | | | | | |
| वेतन | 18364 | 0 | 18364 | 21833 | 0 | 21833 |
| अतिकालीक भत्ता | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| प्रवास खर्च | 0 | 0 | 0 | 77 | 0 | 77 |
| कार्यालयीन खर्च | 54 | 0 | 54 | 67 | 0 | 67 |
| दुरध्वनी, वीज व पाणी शुल्क | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| प्रकाशने | 0 | 0 | 0 | 125 | 0 | 125 |
| व्यावसायिक व विशेष सेवा | 16573 | 0 | 16573 | 17298 | 0 | 17298 |
| एकूण 'ब' स्थूल | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'ब' निव्वळ | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने-** | | | | | | |
| मागणी क्र. प्रधान शीर्ष | | | | | | |
| ओ -९ ३४५४ | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| एकूण 'क' स्थूल | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'क' निव्वळ | 34991 | 0 | 34991 | 39402 | 0 | 39402 |

**TABLE ३.१**
**Financial Requirements**

(Rs in thousands)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Revised Estimates 2022-2023 | | | Budget Estimates २०२३-२०२४ | | | Classification |
| अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | |
| Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | |
| (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) | (1) |
| | | | | | | **Activitywise Classification --** |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Collection of basic statistics |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total 'A' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total 'A' Net |
| | | | | | | **Objectwise Classification--** |
| 21833 | 0 | 21833 | 24016 | 0 | 24016 | Salaries |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Over time allowance |
| 54 | 0 | 54 | 77 | 0 | 77 | Travel expenses |
| 60 | 0 | 60 | 70 | 0 | 70 | Office expenses |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Telephone, Electricity & Water Charges |
| 88 | 0 | 88 | 125 | 0 | 125 | Publication |
| 14703 | 0 | 14703 | 17298 | 0 | 17298 | Professional & Special Services |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total 'B' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total 'B' Net |
| | | | | | | **Source of Finance --** |
| | | | | | | Demand No. Major Head |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | O-9 3454 |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total 'C' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 36740 | 0 | 36740 | 41588 | 0 | 41588 | Total 'C' Net |

## तक्ता ३.२ TABLE 3.2

### कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश व वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरण
### Programme work-load summary and explanation of financial requirements

| अ.क्र. Sr.No. | कार्य / बाब वर्णन | कामाच्या मोजमापाचे परिमाण | केलेलेकाम Work done during २०२१-२२ 2021-22 | केलेलेकाम Work done during २०२२-२३ 2022-23 | करावयाचे काम Work proposed during २०२३-२४ 2023-24 | Unit of Work Measurement | Activity / Item Description |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (3) | (2) |
| 1. | प्रकाशने | | | | | | Publications |
| (1) | महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा | .. | 1 | 1 | 1 | .. | Statistical Abstract of Maharashtra State |
| (2) | महाराष्ट्राची आर्थिक पाहणी | .. | 1 | 1 | 1 | .. | Economic Survey of Maharashtra |
| (3) | महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी | .. | 1 | 1 | 1 | .. | Handbook of Basic Statistics of Maharashtra State |
| (4) | महाराष्ट्राची आर्थिक आकडेवारी | .. | 1 | 1 | 1 | .. | Maharashtra's Economy in Figures |
| (5) | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन | .. | 36 | 36 | 36 | .. | District Socio-economic Review |
| (6) | महाराष्ट्रातील जिल्हयांचे व भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक | .. | 1 | 1 | 1 | .. | Selected Indicators for districts in Maharashtra & States in India |
| (7) | तालुकावार निवडक निर्देशक (जिल्हानिहाय) | .. | 36 | .. | 36 | .. | Talukawise Selected Indicators (Districtwise) |
| (8) | दृष्टिक्षेपात विभाग | .. | .. | .. | 6 | .. | Division at a Glance |
| (9) | पायाभूत सुविधांबाबतची महाराष्ट्र राज्याची सांख्यिकी | .. | 1 | .. | 1 | .. | Infrastructure Statistics of Maharashtra State |
| (10) | महाराष्ट्रातील स्त्रिया व पुरुष-२०२१ | .. | .. | 1 | .. | .. | Women and Men in Maharashtra-2021 |
| 2. | अहवाल | | | | | | Reports |
| | शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष | .. | 1 | 1 | 1 | .. | Employees Master Database |
| 3. | ग्रंथालयाचे व्यवस्थापन (पुस्तके व नियतकालिके) | .. | 8995 | 9024 | 9073 | .. | Maintenance of library (books and periodicals) |

# ४. नियोजनाकरिता आकडेवारी

४.१ या कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने राज्य व जिल्हा उत्पन्नाचे अंदाज, लोकवित्त विषयक आकडेवारीचे विश्लेषण, भांडवल निर्मितीचे अंदाज, किंमती विषयक आकडेवारी, औद्योगिक आकडेवारी व जिल्ह्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांकडील सांख्यिकीय माहितीचे संकलन आणि समन्वय इत्यादींचा समावेश आहे.

४.२ राज्य उत्पन्न अंदाज हे राज्याच्या अर्थव्यवस्थेतील बदल मापनाचे सर्वात महत्वाचे निर्देशक आहे. तत्कालीन मुंबई प्रांताकरिता १९४८-४९ या वर्षासाठी या संचालनालयाकडून राज्य उत्पन्नाचे अंदाज १९५० मध्ये प्रथमत: तयार करण्यात आले. वेगवेगळ्या शासकीय व खाजगी संस्थाकडून आवश्यक माहिती गोळा करुन अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांचे चालू व स्थिर किंमती नुसार राज्य उत्पन्नाचे अंदाज दरवर्षी तयार केले जातात. आधीच्या वर्षाकरिता क्षेत्रवार प्राप्त झालेल्या अद्ययावत माहितीच्या आधारे संबंधित वर्षाचे क्षेत्रवार अंदाज सुध्दा दरवर्षी आवश्यक तेथे सुधारित करण्यात येतात. नुकत्याच संपलेल्या मागील आर्थिक वर्षासाठीच्या प्राथमिक अंदाजाबरोबर वर्षनिहाय व क्षेत्रनिहाय अंदाजाची मालिका, तसेच उपलब्ध प्राथमिक माहितीच्या आधारे चालू आर्थिक वर्षाकरिता राज्य उत्पन्नाचे पुर्वानुमानित अंदाज तयार करुन 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या प्रकाशनात दरवर्षी प्रकाशित करण्यात येतात.

४.३ बदलत्या अर्थव्यवस्थेचा अचूक आढावा घेता यावा व नवीन क्षेत्रांचा / माहितीचा समावेश करुन राष्ट्रीय उत्पन्न / राज्य उत्पन्नाची व्याप्ती सुधारणे शक्य व्हावे यासाठी ठराविक कालावधीनंतर (शक्यतो पाच वर्षांच्या अंतराने) राष्ट्रीय उत्पन्न / राज्य उत्पन्नाचे पायाभूत वर्ष बदलण्यात येते. सद्यस्थितीत पायाभूत वर्ष बदलून २०११-१२ करण्यात आले आहे. सुधारित पायाभूत वर्ष व कार्यपध्दती नुसार वर्ष २०११-१२ ते २०१८-१९ चे अंदाज अद्ययावत करण्यात आले. २०१९-२० चे तिसरे सुधारित अंदाज, २०२०-२१ चे दुसरे सुधारित अंदाज, २०२१-२२ चे पहिले सुधारित अंदाज व २०२२-२३ चे पूर्वानुमान अंदाज तयार करुन 'महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०२२-२३' मध्ये प्रकाशित करण्यात येत आहेत. यावर आाधारीत राज्य उत्पन्न अंदाज – महाराष्ट्र (सन २०११-१२ ते सन २०२१-२२) हा अहवाल तयार करुन सन २०२३-२४ मध्ये प्रकाशित करण्यात येईल. सन २०२२-२३ मध्ये प्रकाशित राज्य उत्पन्न अंदाजाच्या धर्तीवर २०२३-२४ चे अंदाज तयार करुन ते 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२३-२४' मध्ये प्रकाशित करण्यात येतील.

४.४ 'जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न' हे क्षेत्र नियोजनासाठी आवश्यक महत्वाचे निर्देशक आहेत. जिल्हावार उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यासाठी आवश्यक असलेली सेवाक्षेत्रासाठीची जिल्हास्तरावरील आकडेवारी अंशत: उपलब्ध होत असल्याने, जिल्हा उत्पन्नाचे अंदाज अचूकपणे तयार करण्यास अडचणी येतात. तथापि, राष्ट्रीय सांख्यिकीय कार्यालय, भारत सरकार यांनी जिल्हावार उत्पन्न अंदाज तयार करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेली कार्यपध्दती विचारात घेऊन जिल्हा उत्पन्नाची २०११-१२ या पायाभूत वर्ष मालिका चालु व स्थिर (२०११-१२) किंमती नुसार तयार करण्यात आली आहे. २०११-१२ ते २०२१-२२ चे स्थूल व निव्वळ जिल्हा उत्पन्न अंदाज 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३' मध्ये प्रकाशित करण्यात येत आहेत. यावर आाधारीत जिल्हा उत्पन्न अंदाज – महाराष्ट्र (सन २०११-१२ ते

सन २०२१-२२) हा अहवाल तयार करुन सन २०२३-२४ मध्ये प्रकाशित करण्यात येईल. तसेच २०२२-२३ चे स्थूल व निव्वळ जिल्हा उत्पन्न अंदाज ‘महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२३-२४’ मध्ये प्रकाशित करण्यात येतील.

४.५ राज्य उत्पन्नाचे व सार्वजनिक क्षेत्रातील भांडवल निर्मितीचे अंदाज तयार करण्यासाठी राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थसंकल्पातील उत्पन्न व खर्चा विषयक आकडेवारीचे आर्थिक व उद्देशानुसार वर्गीकरण आणि विश्लेषण करुन आवश्यक लेखे व तक्ते तयार करण्याचे काम दरवर्षी करण्यात येते. यावर आाधारीत (सार्वजनिक क्षेत्राचे) एकूण स्थिर भांडवल निर्मितीचे अंदाज वर्ष २०११-१२ ते २०१९-२० हा अहवाल तयार करुन सन २०२३-२४ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

४.६ राज्य शासनाच्या अर्थसंकल्प २०२२-२३ मधील वर्ष २०२०-२१ (प्रत्यक्ष), २०२१-२२ (सुधारित) व २०२२-२३ (अर्थसंकल्पीय अंदाज) या वर्षाच्या उपलब्ध आकडेवारीचे आर्थिक व उद्देशानुसार वर्गीकरण आणि विश्लेषण करुन राज्य / जिल्हा उत्पन्न व भांडवल निर्मितीचे अंदाज तयार करण्याकरिता आवश्यक तक्ते व लेखे २०२२-२३ करिता तयार करण्यात आले आहेत. यावर आाधारीत राज्य अर्थसंकल्प २०२२-२३ चे आर्थिक व उद्देशनिहाय वर्गीकरण हा अहवाल तयार करुन सन २०२३-२४ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

४.७ (अ) अर्थव्यवस्थेतील किरकोळ चलनवाढ मापन करण्याकरिता पायाभूत वर्षाच्या तुलनेत सर्वसामान्य वस्तु आणि सेवांच्या किरकोळ किंमतीत झालेली वाढ ग्राहक किंमती निर्देशांकाद्वारे परिगणित करण्यात येते. ग्राहक किंमती निर्देशांकाकरिता राज्याच्या ग्रामीण व नागरी भागातील जीवनावश्यक वस्तूंच्या किरकोळ किंमती साप्ताहिक पद्धतीने गोळा करण्यात येतात, त्याआधारे ग्रामीण व नागरी क्षेत्राकरिता ग्राहक किंमतींचे निर्देशांक १९६२ पासून नियमितपणे दरमहा परिगणित करण्यात येतात. सुरुवातीला ग्रामीण निर्देशांकाकरिता जुलै ते सप्टेंबर, १९६२ हा तिमाही कालावधी आधारभूत होता, तर नागरी निर्देशांकाकरिता ९ नोव्हेंबर, १९६२ रोजी संपणारा आठवडा हा आधारभूत कालावधी होता. माहे जानेवारी, १९७६ पासून या दोन्ही निर्देशांकांची मालिका कॅलेंडर वर्ष १९७१ हे पायाभूत वर्ष धरुन सुधारीत करण्यात आली. त्यानंतर ही मालिका पुनश्च: १९८३-८४ मध्ये सन १९८२ हे पायाभूत वर्ष धरुन व सन २००४-०५ मध्ये वर्ष २००३ हे पायाभूत वर्ष धरुन सुधारीत करण्यात आली. ग्राहक किंमती निर्देशांकाच्या सध्याच्या मालिकेकरिता (पायाभूत वर्ष २००३) राज्यातील ग्रामीण भागातील निवडलेल्या ६८ केंद्रातून व नागरी भागातील ७४ केंद्रातून किंमती गोळा करण्यात येत आहेत. २००६-०७ पासून पायाभूत वर्ष २००३ = १०० धरुन राज्यातील नागरी व ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमती निर्देशांकाची नवीन मालिका सुरु करण्यात आली. सन २०२१-२२ मध्ये सदर निर्देशांक तयार करण्यात आले असून संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आले आहेत. तसेच सन २०२२-२३ मध्येही सदर निर्देशांक तयार करून संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहेत. सन २०२३-२४ मध्येही सदर निर्देशांक तयार करून संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील.

(ब) या संचालनालयाकडून तयार करण्यात येणारे ग्राहक किंमतींचे निर्देशांक तसेच केंद्र शासनाच्या विविध विभागांमार्फत तयार करण्यात येणारे निरनिराळे निर्देशांक दरमहा या संचालनालयाकडून विहित नमुन्यातील तक्ता

क्रमांक १ व २ मध्ये प्रकाशित करण्यात येतात. या निर्देशांकाचा उपयोग शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर खाजगी संस्था यांना निर्देशांकातील वाढीप्रमाणे कामगारांच्या कामाच्या खर्चाची देयके तयार करण्यासाठी होतो. औद्योगिक कामगारांकरिताच्या अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांकांचा उपयोग राज्यातील काही कारखाने औद्योगिक कामगारांकरिता महागाई भत्त्याचे दर ठरविण्यासाठी करतात. सन २०२१-२२ मध्ये सदर निर्देशांक तयार करून संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आले आहेत. तसेच सन २०२२ -२३ या वर्षात अशा प्रकारचे महत्वाचे विविध निर्देशांक असलेले तक्ते दरमहा तयार करण्यात येऊन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येत आहेत. सन २०२३-२४ मध्येही सदर तक्ते दरमहा तयार करुन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील.

(क) राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१८) परिगणित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या निकषांनुसार जिल्हास्तरीय ग्राहक किंमती निर्देशांक परिगणनेकरिता वस्तूसूची, वस्तूभार तयार करण्यात आले आहेत आणि केंद्रांची निवड करण्यात आली आहे. यांस राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाकडून मान्यता घेण्यात आली आहे. जिल्हास्तरीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१८) परिगणनेकरिता १९२ ग्रामीण व १७७ नागरी केंद्रांची निवड करण्यात आली आहे. निवडण्यात आलेल्या केंद्रातील १९२ ग्रामीण व २७५ नागरी बाजारपेठांमधून किंमतीचे संकलन करण्यात येत आहे. ग्राहक किंमती निर्देशांक परिगणनेकरिता Web Portal तयार करण्यात आले आहे. सदर Web Portal प्रादेशिक कार्यालय व जिल्हा सांख्यिकी कार्यालय यांच्याकरिता Live करण्यात आले असून जिल्हा सांख्यिकी कार्यालयामार्फत माहीती नोंदणीचे काम सुरु करण्यात आले आहे. ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) चालू मालिकेशी तुलना करता ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१८) नवीन मालिकेंतर्गत येणाऱ्या वस्तूंमध्ये ग्रामीण भागाकरिता १०६ वस्तूंवरून २५५ तर नागरी भागाकरिता १२७ वरून २५८ एवढी वाढ होणार आहे. दिनांक १ सप्टेंबर, २०२० पासून भावसंकलकांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. सन २०२२-२३ करिता जिल्हास्तरीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१८) परिगणनेकरिता राज्याच्या ग्रामीण व नागरी भागातील जीवनावश्यक वस्तूंच्या साप्ताहिक किरकोळ किंमती गोळा करण्यात येत आहेत. तसेच सन २०२३-२४ करिता जिल्हास्तरीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१८) परिगणनेकरिता राज्याच्या ग्रामीण व नागरी भागातील जीवनावश्यक वस्तूंच्या साप्ताहिक किरकोळ किंमती गोळा करण्यात येतील. तथापि जिल्हास्तरीय ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१८) नवीन मालिका नियमित होईपर्यंत ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) चालू मालिकेचे काम सुरु ठेवण्याचे निर्देश आहेत.

(ड) १. राज्य विधानमंडळाच्या तीनही अधिवेशनाकरिता राज्यातील 'अन्नधान्य उत्पादन व गरज' या विषयाची मास्टर नोट तयार करून अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास उपलब्ध करून दिली जाते.

२. राज्यातील ५ केंद्रासाठी (जळगाव, नांदेड, औरंगाबाद, कोल्हापूर व अकोला) औद्योगिक कामगारांसाठी राज्यस्तरीय ग्राहक मूल्य निर्देशांक कामगार आयुक्तालयामार्फत परिगणित करण्यात येतात. सदर निर्देशांकाची छाननी करून अंतिम

निर्णय घेण्यासाठी दरमहा कामगार आयुक्तालयामार्फत बैठक आयोजित केली जाते. सदर बैठकीस अर्थ शाखेतील अधिकारी / कर्मचारी उपस्थित राहून सदर निर्देशांक प्रमाणित करून देतात.

३. राज्य शासकीय कार्यालये / निमशासकीय कार्यालये / केंद्र शासन, इतर खाजगी संस्था यांना त्यांच्या मागणीनुसार किंमती अथवा निर्देशांकांची माहिती उपलब्ध करून दिली जाते.

४. सदर माहितीचे तक्तीकरण व विश्लेषण करण्यात येते व त्या आधारे माहिती 'किंमती' या 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या अर्थसंकल्पीय प्रकाशनातील प्रकरणात समाविष्ट केली जाते .

४.८ (अ) राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालय, भारत सरकार, दरवर्षी वार्षिक उद्योग पाहणीद्वारे (वाउपा) नोंदणीकृत कारखान्यांबाबतची सांख्यिकीय माहिती गोळा करते. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार, सदर माहितीवर संस्करण करुन ती माहिती राज्य शासनास जिल्हास्तरीय अंदाज तयार करण्यासाठी उपलब्ध करुन देत होते. जिल्हानिहाय अंदाज तयार करण्याकरिता सदर माहिती पुरेशी नसल्याने वार्षिक उद्योग पाहणीसाठी राज्य यंत्रणेने राज्य नमुन्यातील कारखान्यांसाठी माहिती गोळा करावी असे निर्देश केंद्र शासनाने दिले आहेत. त्यानुसार २००५-०६ या वर्षापासून हे काम हाती घेण्यात आले आहे.

(ब) वाउपा २०१३-१४ चे क्षेत्रकाम सन २०१६-१७ मध्ये सुरु करण्यात आले व सन २०१८-१९ मध्ये पूर्ण करण्यात आले. वाउपा २०१३-१४ करीता केंद्र नमुना व राज्य नमुन्यात गोळा केलेल्या एकत्रित माहितीवर आधारित अहवाल सन २०२२-२३ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे.

(क) वाउपा २०१४-१५ चे क्षेत्रकाम नोव्हेंबर २०१७ मध्ये हाती घेण्यात आले व सन २०१९-२० मध्ये पूर्ण करण्यात आले. वाउपा २०१४-१५ करीता केंद्र नमुना व राज्य नमुन्यात गोळा केलेल्या एकत्रित माहितीवर आधारित जिल्हास्तरीय अंदाज तयार करण्याचे काम सन २०२३-२४ मध्ये पूर्ण करण्यात येईल. वाउपा २०१५-१६ व २०१६-१७ असे दोन वर्षाचे क्षेत्रकाम अनुक्रमे जून २०१८ व जानेवारी २०१९ मध्ये हाती घेण्यात आले. वाउपा २०१५-१६ आणि २०१६-१७ चे क्षेत्रकाम व त्या अनुषंगिक इतर कामे नियोजन विभागाची मान्यता घेऊन बंद करण्यात आली आहेत. वाउपा २०१७-१८ करीता केंद्र नमुना व राज्य नमुन्यात गोळा केलेल्या एकत्रित माहितीवर आधारित अहवाल सन २०२१-२२ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे.

(ड) वाउपा २०१८-१९ चे क्षेत्रकाम जानेवारी २०२० मध्ये हाती घेण्यात आले व सन २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्यात आले. वाउपा २०१८-१९ करीता केंद्र नमुना व राज्य नमुन्यात गोळा केलेल्या एकत्रित माहितीवर आधारित अहवाल सन २०२२-२३ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे.

(इ) वाउपा २०१९-२० चे क्षेत्रकाम जून २०२१ मध्ये हाती घेण्यात आले व केंद्र नमुना व राज्य नमुन्यात गोळा केलेल्या एकत्रित माहितीवर आधारित अहवाल सन २०२२-२३ मध्ये प्रकाशित करण्यात आला आहे.

(फ) वाउपा २०२०-२१ चे क्षेत्रकाम जून २०२२ मध्ये हाती घेण्यात आले. केंद्र नमुना व राज्य नमुन्यात गोळा केलेल्या एकत्रित माहितीवर आधारित अहवाल सन २०२३-२४ मध्ये प्रकाशित करण्यात येईल.

४.९ महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे अधिनस्त जिल्हा कार्यालय यांच्याकडून नोंदणीकृत कारखान्यांचे

(कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणी झालेले) कामगारांची संख्या, कामाचे तास, रजा, कामगार कल्याण व सुरक्षिततेच्या सुविधा इत्यादी बाबींविषयक माहिती असलेले विवरणपत्र क्र.२७ व इतर माहिती दरवर्षी संस्करित करण्यासाठी प्राप्त होत होती. सन २०१६-१७ मध्ये (२०१५ या वर्षाची) सुमारे ३९,१३२ कारखान्यांची सदर माहिती प्राप्त झाली. सदर माहितीची छाननी करण्यात येऊन त्यावर आधारित तक्ते तयार करण्यात आले. हे तक्ते "महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८" या प्रकाशनात प्रकाशित करण्यात आले. विहित नमुन्यातील तक्ते भारत सरकारच्या श्रम मंत्रालय, चंदीगड यांना आणि संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांना पाठविण्यात आले. सन २०१६ पासून औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने सदर माहिती संकलनाकरिता आज्ञावली विकसित केली आहे. सन २०१६-१७ ते २०२२-२३ या वर्षाकरिताची विहित नमुन्यातील कारखानेविषयक माहिती अप्राप्त असल्याने तक्तीकरण या संचालनालयामार्फत करणे शक्य झालेले नाही. सन २०२३-२४ मध्ये सदर माहिती उपलब्ध होईल असे अपेक्षित असून माहिती उपलब्ध झाल्यास त्यावर आधारित तक्ते तयार करण्यात येतील.

४.१० राज्यस्तरीय औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२) चे परिगणना करण्याचे काम सन २०१९-२० मध्ये हाती घेण्यात आले. राष्ट्रीय सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून प्राप्त मूळ नमूना यादीतील ५५८ कारखान्यांपैकी २४० कारखान्यांची मासिक आकडेवारी वेब पोर्टलच्या माध्यमातून सन २०११-१२, २०१९-२० ते २०२२-२३ या वर्षाकरिता गोळा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सन २०२१-२२ मध्ये प्रायोगिक तत्वावर औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२) चे परिगणन करण्यात आले. सन २०२१-२२ पासून सदर निर्देशांक परिगणनेचे काम करण्यात येत आहे व सन २०२३-२४ मध्ये हे काम नियमित करण्यात येईल.

४.११ सन १९५७-५८ मध्ये जिल्हा सांख्यिकी कार्यालयांची स्थापना झाल्यापासून प्रतिवर्षी 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन' हे प्रकाशन जिल्हा सांख्यिकी कार्यालयांमार्फत प्रकाशित करण्यात येत आहे. या प्रकाशनात जिल्ह्यातील विविध सामाजिक व आर्थिक विषयांवरील तालुकानिहाय आकडेवारी दिली जाते. सन २००९-१० मध्ये सदर प्रकाशनाची पुनर्रचना करण्यात येऊन पुनर्रचित प्रकाशन सन २०१० मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. तसेच सन २०१८-१९ मध्ये सदर प्रकाशनाची पुनश्च: पुनर्रचना करण्यात आली. सन २०२१ व सन २०२२ साठी सर्व जिल्ह्यांचे प्रकाशन प्रकाशित झाले आहे. सन २०२३ चे प्रकाशन संबंधित वर्षात प्रकाशित करण्यात येईल.

४.१२ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई येथे १९६४ साली 'संशोधन व विश्लेषण' कक्ष निर्माण करण्यात आला. १९८५-८६ या वर्षात शाखेला बळकटी आणण्यासाठी मुख्य संशोधन अधिकाऱ्याचे एक पद निर्माण करण्यात आले.

४.१३ गुणात्मक, विश्वासार्ह सांख्यिकी माहिती वेळेवर प्राप्त व्हावी यासाठी राज्यातील सांख्यिकीय प्रणालीचे बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत 'सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य' ही केंद्रीय क्षेत्र योजना राबविण्यासाठी तयार करण्यात आलेला आराखडा राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने मंजूर केला आहे. या आराखड्यानुसार केंद्र शासनाने रु. १८.०५ कोटी इतका निधी मंजूर केला असून सदर निधी मार्च

२०२५ पर्यंत खर्च करण्यात येईल. मंजूर निधी पैकी रु. ४.४८ कोटी इतका निधी माहे जुलै, २०२१ अखेर प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय आणि नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या सुधारीत मार्गदर्शक सुचनेनुसार 'सांख्यिकी सक्षमीकरणासाठी सहाय्य' या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

४.१४ राज्यातील विकास प्रक्रिया व त्यातील टप्पे जाणून घ्यावेत व ते समजून घेत असताना शासकीय यंत्रणेतील कामकाज, त्यातील घटकांचा ताळमेळ आणि निर्णय प्रक्रियेचा अनुभव तरुणांनी मिळवावा, त्यातून समर्पित वृत्तीने समाजसेवा करण्यासाठी प्रामाणिक, ध्येयवादी, सुजाण नागरिक तयार व्हावेत यासाठी राज्यातील तरुणांसाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.४००/२०१४/१२, दि. २९ मे, २०१५ अन्वये 'मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम' सुरु करण्यात आला आहे. सन २०१६ पासून सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी अर्थ व सांख्यिकी संचालनालयावर सोपविण्यात आली होती. त्यानुसार सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या कालावधीत सदर कार्यक्रम राबविण्यात आला होता. शासनाने रद्द केल्याने सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीत सदर कार्यक्रम राबविण्यात आला नाही. सन २०२३-२४ मध्ये सदरहू कार्यक्रम राबविण्यात येत असून कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ करिता एकूण ६० उमेदवारांची 'फेलो' म्हणून निवड करण्यात येणार आहे. या फेलोंना शासनाच्या विविध विभाग/ कार्यालयात गट 'अ' समकक्ष अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात येणार असून त्यांना दरमहा ₹ ७०,०००/- मानधन व ₹ ५,०००/- प्रवास खर्च अशी एकूण ₹ ७५,०००/- इतकी रक्कम छात्रवृतीच्या स्वरुपात देण्यात येणार आहे. फेलोंच्या निवडीबाबत आवश्यक असलेली कार्यवाही करणे, फेलोंना अनुज्ञेय छात्रवृत्ती व प्रवासखर्च अदा करण्याबाबतची कार्यवाही करणे, फेलोंचे प्रशिक्षण आयोजित करणे, वैद्यकीय तपासणी करुन घेणे, चारित्र्य पडताळणी करुन घेणे, फेलोंनी केलेल्या कामाचा मासिक अहवाल प्राप्त करुन घेणे, त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करणे इ. कामे संचालनालयामार्फत करण्यात येणार आहेत. कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर फेलोंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

## शाश्वत विकास ध्येये

### ४.१५ शाश्वत विकास ध्येयांची पार्श्वभूमी

१) संयुक्त राष्ट्रांच्या १९३ सदस्य देशांनी दि. २५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या आमसभेत शाश्वत विकासाचा अजेंडा स्वीकारला आहे. यामध्ये शाश्वत विकासाची १७ ध्येये व या ध्येयांतर्गत १६९ लक्ष्ये असून ती १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०३० पर्यंत साध्य करायची आहेत.

२) राष्ट्रीय स्तरावर ध्येये साध्य करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असून शाश्वत विकास ध्येयांसाठी निती आयोग नोडल संस्था म्हणून कार्यरत आहे.

३) या १७ शाश्वत विकास ध्येये आणि १६९ लक्ष्ये यांची राज्यात कालबद्धरित्या अंमलबजावणी करण्यासाठी "नियोजन विभाग" हा नोडल विभाग आहे. नियोजन विभागाने दि. ०३ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिनस्त "शाश्वत विकास ध्येय - अंमलबजावणी आणि समन्वय केंद्र" स्थापन केले आहे.

**४.१६ शाश्वत विकास ध्येयांसंबंधी अलीकडील कामाच्या प्रगतीची संक्षिप्त माहिती**

१) राज्यस्तरावर शाश्वत विकास ध्येये साध्य करण्यासंबंधी प्रगतीचे मापन करण्यासाठी "महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येये राज्य निर्देशक आराखडा " तयार करण्यात आला आहे. हा आराखडा २९ जून २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आला असून यामध्ये २३७ निर्देशकांचा समावेश आहे.

२) राज्यात राबविल्या जाणाऱ्या १६०० हुन अधिक योजनांची शाश्वत विकास ध्येये व लक्ष्यांशी सांगड घालण्यात आली असून त्यावर आधारित "महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येयांशी सांगड अहवाल २०२१" हा विश्लेषणात्मक अहवाल २९ जून २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे. या अहवालाद्वारे शासनाचे विविध विभाग विशिष्ट शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यास कशाप्रकारे एकत्रित योगदान देत आहेत तसेच एका विशिष्ट विभागाच्या योजना विविध ध्येये गाठण्यासाठी सहाय्यभुत ठरत आहेत याचे आकलन होते.

३) शाश्वत विकास ध्येयांच्या जिल्हा स्तरावरील प्रगतीचे मापन करण्यासाठी "महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येये जिल्हा निर्देशक आराखडा " तयार करण्यात आला असून त्याला शासनाची मंजुरी मिळाली आहे. या आराखड्यामध्ये १२० निर्देशकांचा समावेश आहे. या आराखड्याद्वारे जिल्ह्यांच्या शाश्वत विकास ध्येये साध्य करण्यासंबंधी प्रगतीचा तुलनात्मक आढावा घेण्यास मदत होईल.

४) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेमध्ये राज्य, क्षेत्र व स्थानिक स्वराज्य स्तरावरील अधिकाऱ्यांसाठी शाश्वत विकास ध्येयांसंबंधी प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

५) शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने राज्यातील प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी राज्य निर्देशक आराखड्यातील २३७ निर्देशकांच्या आधारे सन २०१५-१६ च्या माहितीचा आधार घेवुन शाश्वत विकास ध्येये आधाररेषा अहवाल तयार करण्यात आला आहे. शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी राज्य स्तरीय यंत्रणाकडून त्यांच्या विभागासंबधित (३२ विभागाकडून) प्रतीमाह निर्देशकांच्या माहितीचे संकलन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत करण्यात येत आहे.

## तक्ता ४.१
## वित्तीय आवश्यकता

(रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण-** | | | | | | |
| अर्थशास्त्र | 9595 | 0 | 9595 | 12209 | 0 | 12209 |
| नियोजनाकरिता आकडेवारी | 287583 | 29166 | 316749 | 383780 | 93931 | 477711 |
| एकूण 'अ' स्थूल | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'अ' निव्वळ | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण-** | | | | | | |
| वेतन | 282028 | 15312 | 297340 | 344489 | 19599 | 364088 |
| अतिकालीक भत्ता | 509 | 27 | 536 | 451 | 38 | 489 |
| प्रवास खर्च | 1128 | 87 | 1215 | 2484 | 255 | 2739 |
| कार्यालयीन खर्च | 5559 | 1867 | 7426 | 4892 | 14254 | 19146 |
| दुरध्वनी, वीज | 1800 | 22 | 1822 | 2751 | 148 | 2899 |
| भाडेपट्टी व कर | 3864 | 0 | 3864 | 4000 | 3541 | 7541 |
| प्रकाशने | 0 | 230 | 230 | 0 | 2100 | 2100 |
| पेट्रोल, तेल व वंगन | 1293 | 0 | 1293 | 1120 | 180 | 1300 |
| जाहिरात व प्रसिध्दी | 0 | 0 | 0 | 0 | 6000 | 6000 |
| सहायक अनुदान (वेतनेतर) | 0 | 1070 | 1070 | 3905 | 9720 | 13625 |
| इतर प्रशासकीय खर्च | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| व्यावसायीक व विशेष सेवा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कंत्राटी सेवा | 762 | 2205 | 2967 | 31500 | 33384 | 64884 |
| संगणक खर्च | 235 | 37 | 272 | 397 | 711 | 1108 |
| मोटार वाहने | 0 | 8309 | 8309 | 0 | 4000 | 4000 |
| एकूण 'ब' स्थूल | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'ब' निव्वळ | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने-** | | | | | | |
| मागणी क्र. प्रधान शीर्ष | | | | | | |
| ओ -९ ३४५४ | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| एकूण 'क' स्थूल | 297178 | 29166 | 326344 | 395989 | 93931 | 489920 |
| वजा वसुली | 245 | 0 | 245 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'क' निव्वळ | 296933 | 29166 | 326099 | 395989 | 93931 | 489920 |

**TABLE ४.१**

**Financial Requirements**

( Rs in thousands)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ | | | Classification |
|---|---|---|---|---|---|---|
| Revised Estimates 2022-2023 | | | Budget Estimates २०२३-२०२४ | | | |
| अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | |
| Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | |
| (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) | (1) |
| | | | | | | **Activitywise Classification --** |
| 14702 | 0 | 14702 | 15026 | 0 | 15026 | Economics |
| 378768 | 55527 | 434295 | 413762 | 128890 | 542652 | Statistics for Planning |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | Total 'A' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | Total 'A' Net |
| | | | | | | **Objectwise Classification --** |
| 346989 | 18619 | 365608 | 380536 | 34970 | 415506 | Salaries |
| 361 | 20 | 381 | 474 | 12 | 486 | Over time allowance |
| 1738 | 179 | 1917 | 2608 | 321 | 2929 | Travel expenses |
| 4403 | 12829 | 17232 | 5001 | 71465 | 76466 | Office expenses |
| 2476 | 31 | 2507 | 2751 | 256 | 3007 | Telephone, Electricity |
| 3600 | 1001 | 4601 | 4000 | 4341 | 8341 | Rents , Rates & Taxes |
| 0 | 991 | 991 | 0 | 1550 | 1550 | Publication |
| 3620 | 162 | 3782 | 3000 | 302 | 3302 | Petrol,Oil & Lubricicants |
| 0 | 4200 | 4200 | 0 | 6000 | 6000 | Advertising & Publicity |
| 3905 | 9720 | 13625 | 1 | 0 | 1 | Grant in aid (Non salary) |
| 0 | 1 | 1 | 0 | 1 | 1 | Other administrative expenses |
| 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | Professional & Special Services |
| 26100 | 4848 | 30948 | 30000 | 6361 | 36361 | Contractual Services |
| 278 | 126 | 404 | 417 | 910 | 1327 | Computers Expenses |
| 0 | 2800 | 2800 | 0 | 2400 | 2400 | Motor Vehicle |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | Total 'B' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | Total 'B' Net |
| | | | | | | **Source of Finance --** |
| | | | | | | Demand No. Major Head |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | O-9 3454 |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | Total 'C' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 393470 | 55527 | 448997 | 428788 | 128890 | 557678 | Total 'C' Net |

**तक्ता ४.२ TABLE 4.2**

**कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश व वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरण**

**Programme work-load summary and explanation of financial requirements**

| अ.क्र. Sr.No. | कार्य / बाब वर्णन | कामाच्या मोजमापाचे परिमाण | केलेले काम Work done during २०२१-२०२२ 2021-2022 | केलेले काम Work done during २०२२-२०२३ 2022-2023 | करावयाचे काम Work proposed during २०२३-२०२४ 2023-2024 | Unit of Work Measurement | Activity / Item Description |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (3) | (2) |
| 1 | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता किरकोळ किंमतींचे मासिक निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३=१००) | संख्या | 12 | 12 | 12 | No. | Monthly index of retail prices for rural area of Maharashtra (Base year 2003=100) |
| 2 | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता किरकोळ किंमतींचे मासिक निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३=१००) | संख्या | 12 | 12 | 12 | No. | Monthly index of retail prices for urban area of Maharashtra (Base year 2003=100) |
| ३ | महाराष्ट्र राज्यातील किंमतींच्या पातळीचे मासिक समालोचन | संख्या | 12 | 12 | 12 | No. | Monthly review of price situation of Maharashtra State |
| 4 | निरनिराळे महत्वाचे ग्राहक किंमती व घाऊक किंमतींचे निर्देशांक दर्शविणारा तक्ता | संख्या | 12 | 12 | 12 | No. | Statement showing different important consumer and wholesale price indices |
| 5 | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता किरकोळ किंमतींचे संकलन व महिती नोंदणी (पायाभूत वर्ष २०१८=१००) | संख्या (बाजारपेठ ) | - | - | 192 | No. (Market) | Collection & data entry of retail prices for rural area of Maharashtra (Base year 2018=100) |
| 6 | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता किरकोळ किंमतींचे संकलन व महिती नोंदणी (पायाभूत वर्ष २०१८=१००) | संख्या (बाजारपेठ) | - | - | 275 | No. (Market) | Collection & data entry of retail prices for urban area of Maharashtra (Base year 2018=100) |

## तक्ता ४.२ TABLE 4.2

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (3) | (2) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | वार्षिक उद्योग पाहणी | (संख्या) | ASI<br>18-19 | ASI ASI<br>19-20 20-21 | ASI<br>21-22 | (No.) | Annual Survey of Industrie (ASI) |
| | (अ) क्षेत्रकाम | कारखाने | 2509 | 2369 2402 | ------ | Factories | Fieldwork |
| | | | ASI ASI ASI ASI<br>15-16 16-17 17-18 18-19 | ASI ASI<br>18-19 19-20 | ASI<br>20-21 | | |
| | (ब) सुक्ष्मतपासणी व वैधतीकरण | पत्रके | 535 339 142 1601 | 1207 2369 | 2402 | Schedules | Scrutiny of returns and validations |
| | (क) तक्तीकरण | तक्ते | ASI<br>17-18 | ASI ASI ASI ASI<br>13-14 14-15 18-19 19-20 | ASI<br>20-21 | Tables | Tabulation |
| | | | 13 | 13 13 13 13 | 13 | | |
| | (ड) अहवाल लेखन | (संख्या) | ASI ASI ASI<br>11-12 12-13 17-18 | ASI ASI<br>13-14 19-20 | ASI ASI<br>14-15 20-21 | (No.) | Report Writing |
| | | | 1 1 1 | 1 1 | 1 1 | | |
| 8 | औद्योगिक उत्पादन निर्देशांक | (संख्या) | Yr. Yr. Yr. Yr Yr.<br>11-12 16-17 17-18 18-19 19-20 | Yr. Yr. Yr. Yr.<br>11-12 19-20 20-21 21-22 | Yr. Yr. Yr. Yr. Yr.<br>11-12 19-20 20-21 21-22 22-23 | (No.) | Index of Industrial Production (IIP) |
| | (अ) क्षेत्रकाम | कारखाने | 222 222 222 222 222 | 240 | 478 478 478 478 478 | Factories | Fieldwork |
| | (ब) सुक्ष्मतपासणी व वैधतीकरण पत्रके | कारखाने | 222 222 222 222 222 | | 478 478 478 478 478 | Schedules | Scrutiny of returns and validations |
| | (क) तक्तीकरण | तक्ते | | | 12 12 12 12 | Tables | Tabulation |
| 9 | राज्य अर्थसंकल्पाचे आर्थिक व उद्देशानुसार वर्गीकरण | | | | | | Economic and purpose classification of State budget |
| | (अ) वर्ष | संख्या | 3 | 3 | 3 | No. | Year |
| | (ब) अहवाल | संख्या | 1 | 1 | 1 | No. | Report |
| 10 | (अ) राज्य उत्पन्नाचे अंदाज | संख्या | 1 | 1 | 1 | No. | Estimation of State Income |
| | (ब ) जिल्हा उत्पन्नाचे अंदाज | संख्या | 1 | 1 | 1 | No. | Estimation of District Income |
| 11 | जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन तयार करणे | संख्या | 36 | 36 | 36 | No. | Preparation of District Socio-economic Review |

**तक्ता ४.३ TABLE 4.3**

**कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश**

**Programme work-load summary**

| अ. क्र. | कार्य / बाब वर्णन | केलेले काम (सन २०२२-२३) | करावयाचे काम (सन २०२३-२४) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येये राज्य निर्देशक आराखडा<br>Maharashtra SDGs State Indicator Framework | राज्यस्तरावर शाश्वत विकास ध्येये साध्य करण्यासंबंधी प्रगतीचे मापन करण्यासाठी "महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येये राज्य निर्देशक आराखडा " तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यास शासनाने मान्यता दिलेली असून हा आराखडा २९ जून २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आला असून यामध्ये २३७ निर्देशकांचा समावेश आहे.<br>In order to periodically assess the progress the State has made towards the achievement of SDGs, 'Maharashtra SDGs State Indicator Framework' has been prepared. It was published on 29th June, 2022 which consists of total 237 indicators. | १. शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने राज्यातील प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी राज्य निर्देशक आराखड्यातील २३७ निर्देशकांच्या आधारे सन २०१५-१६ च्या माहितीचा आधार घेवुन शाश्वत विकास ध्येये आधाररेषा अहवाल तयार करुन प्रकाशित करणे.<br>1. To measure the progress of SDGs in the state it is decided to prepare and publish the Baseline Report of SDGs considering data of the 237 indicators from the State Indicator Framework for the year 2015-16.<br>२. शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी राज्य स्तरीय प्रगती मापन अहवाल तयार करणे.<br>2. Preparation of progress report of SDGs for measuring the further progress of SDGs in the state.<br>३. शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने प्रगतीचा आढावा घेवुन (सर्व संबंधित विभागाची कार्यशाळा घेवुन ) आवश्यकतेनुसार सुधारीत निर्देशक आराखडा तयार करणे.<br>3. Refine the existing State Indicator Framework by considering availability of new data sets (by taking reviews of respective departments through workshops) |
| २. | महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येयांशी सांगड अहवाल २०२१<br>Maharashtra SDG scheme mapping report 2021 | राज्यात राबविल्या जाणाऱ्या १६०० हुन अधिक योजनांची शाश्वत विकास ध्येये व लक्ष्यांशी सांगड घालण्यात आली आहे. सदर अहवालास शासनाने मान्यता दिलेली असून "महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येयांशी सांगड अहवाल २०२१" हा विश्लेषणात्मक अहवाल २९ जून २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे.<br>'Maharashtra SDG Scheme Mapping Report 2021' has been published on 29th June, 2022. The report has been prepared based on the analysis of mapping of more than 1600 schemes to SDGs and targets. It provides an insight about the contribution of various departments in the achievement of a specific SDG and also, impact of the initiatives of the single department on various SDGs. | शासनामार्फत नव्याने राबविल्या जाणाऱ्या योजनांची सांगड शाश्वतविकास ध्येयांशी घालणे.<br>To map new schemes to be implemented by government to SDGs |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| **३.** | महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येये जिल्हा निर्देशक आराखडा<br>Maharashtra SDG district indicator Framework | शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील प्रगतीचे मापन करण्यासाठी "महाराष्ट्र शाश्वत विकास ध्येये जिल्हा निर्देशक आराखडा " तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या आराखड्यामध्ये १२० निर्देशकांचा समावेश आहे.<br>'Maharashtra SDGs District Indicator Framework' has also been prepared consisting of total 120 indicators and has been approved by the Government of Maharashtra. This framework will allow regular tracking of progress towards SDGs at district level. Also, comparative assessment of SDGs related progress across districts will be possible with the help of this indicator framework. | १. शाश्वत विकास ध्येयांच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्याचा आधार रेषा अहवाल व प्रगती मापन अहवाल तयार करणे.<br>1. To prepare the baseline and progress report of SDGs for each district<br>२. जिल्हा स्तरावरील प्रगतीचा आढावा घेवुन (सर्व संबंधित जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची कार्यशाळा घेवुन) सुधारीत निर्देशक आराखडा तयार करणे.<br>2. Refine the existing District Indicator Framework by considering availability of new data sets (by taking reviews of respective district level officials through workshops) |

वैद्यकीय व्यावसायिक ` या जिल्ह्यात
१३९ नोंदणी व्यवसायिकांपैकी आह
करण्यात आल्या. नोंदणी व्यवसायिक
व्यवसायिकांपैकी ३१ व्यवसायिक प्रॅक्टिस
मिश्रपॅथीमध्ये प्रॅक्टिस करणे शक्य ह
नोंदणी हे काम प्रॅक्टिस करण्यासाठी
कार्यक्षमतेबद्दल चिंता व्यक्त
न बाह्यरुग्ण सेवा काम करणे

१.१२ प्रश्नांचे स्वरूप नोंदणी
वैद्यकशास्त्र आहे वर्ष, २०११ नोंदणी
वर्ष, २०१३ दरम्यान नोंदणी कर
कार्यक्रम आयुष कार्य म
CAMS (Comprehensive A
Survey) ` आणि आयुर्वेद पद्ध
AYUSH ` या जिल्ह्यात १४०
नोंदणी व्यवसायिक निवडक
करण्यात येत आहे. उद्देश हेच
हे CAPI या संगणक करण्यात

१.१३ प्रश्नावली नोंदणी संगण
नोंदणी कार्यान्वित आहे. आ
निवडणूक व व्यवसायिक प्रशिक्षण
उपलब्ध प्रश्नावली नियमित निवड
सामाजिक व आर्थिक नोंदणी ग्रुप
ईश्वराच्या उद्देशाने हे नोंदणी सर्व

आणि या विषयांतर्गत केलेला अहवाल सन २०२२-२३ मध्ये पूर्ण झाला असून सदर अहवाल संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

५.१५ निरनिराळ्या शासकीय विभागातील सांख्यिकी कक्षांमध्ये एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने शासनाने या संचालनालयाला "प्रमुख संस्था" म्हणून घोषित केले असून सांख्यिकी प्रस्तावांसाठी "संदर्भ संस्था" म्हणून प्राधिकृत केले आहे. त्याकरिता शासनाच्या निरनिराळ्या विभागांच्या सांख्यिकीय प्रस्तावांची छाननी करुन तांत्रिक मार्गदर्शन करावे लागते. अशाप्रकारे इतर विभागांकडून सांख्यिकीय प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याबाबत वर्ष २०२३-२४ मध्ये तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येईल.

५.१६ 'शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष' अंतर्गत राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची माहिती संगणकीय प्रणालीमध्ये दरवर्षी अद्ययावत करण्यात येते. 'शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष २०२१' अंतर्गत सर्व ३६ जिल्हा सांख्यिकी कार्यालयांमार्फत सुमारे ७.३१ लाख कर्मचाऱ्यांची माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही एकूण १२,५१२ आहरण व संवितरण कार्यालयांकडून पूर्ण करण्यात आली आहे. 'शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष २०२२' अंतर्गत सुमारे ७.२२ लाख कर्मचाऱ्यांची माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही सुमारे १२,६५५ आहरण व संवितरण कार्यालयांमार्फत सुरु आहे.

## तक्ता ५.१
## वित्तीय आवश्यकता

(रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण-** | | | | | | |
| पाहण्या, अभ्यास व गणना.. | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| एकूण 'अ' स्थूल | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'अ' निव्वळ | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण-** | | | | | | |
| वेतन | 82522 | 0 | 82522 | 131918 | 0 | 131918 |
| अतिकालीक भत्ता | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| प्रवास खर्च | 734 | 0 | 734 | 2779 | 0 | 2779 |
| कार्यालयीन खर्च | 60 | 0 | 60 | 246 | 0 | 246 |
| दुरध्वनी, वीज व पाणीशुल्क | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| व्यावसायिक व विशेष सेवा | 702 | 0 | 702 | 937 | 0 | 937 |
| संगणक खर्च | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सहायक अनुदान (वेतनेतर) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सहायक अनुदान (वेतन) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'ब' स्थूल | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'ब' निव्वळ | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने-** | | | | | | |
| मागणी क्र. प्रधान शीर्ष | | | | | | |
| ओ -९ ३४५४ | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| एकूण 'क' स्थूल | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'क' निव्वळ | 84018 | 0 | 84018 | 135882 | 0 | 135882 |

**TABLE ५.१**

**Financial Requirements**

(Rs in thousands)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ | | | Classification |
|---|---|---|---|---|---|---|
| Revised Estimates 2022-2023 | | | Budget Estimates 2023-2024 | | | |
| अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | |
| Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | |
| (8) | (9) | (10) | | | (11) | (1) |
| | | | | | | **Activitywise Classification --** |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Surveys, Studies & Censuses |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total 'A' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total 'A' Net |
| | | | | | | **Objectwise Classification --** |
| 80000 | 0 | 80000 | 131918 | 0 | 131918 | Salaries |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Over time allowance |
| 1945 | 0 | 1945 | 2918 | 0 | 2918 | Travel expenses |
| 221 | 0 | 221 | 258 | 0 | 258 | Office expenses |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Telephone, Electricity & Water Charges |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Professional & Special Services |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Computers Expenses |
| 0 | 0 | 0 | 1000 | 0 | 1000 | Grant in aid (Non salary) |
| 796 | 0 | 796 | 0 | 0 | 0 | Grant in aid (salary) |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total 'B' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total 'B' Net |
| | | | | | | **Source of Finance --** |
| | | | | | | Demand No. Major Head |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | O-9 3454 |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total 'C' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 82964 | 0 | 82964 | 136096 | 0 | 136096 | Total 'C' Net |

## तक्ता ५.२ TABLE 5.2
### कार्यभाराचा संक्षिप्त कार्यक्रम
### Work-load summary programme

| अ.क्र. | कार्य / बाब वर्णन | कामाच्या मोजमापाचे परिमाण | केलेले काम Work done during २०२१-२०२२ 2021-2022 | केलेले काम Work done during २०२२-२०२३ 2022-2023 | करावयाचे काम Work proposed during २०२३-२०२४ 2023-2024 | Unit of Work Measurement | Activity / Item Description |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (3) | (2) |
| (अ) | राष्ट्रीय नमुना पाहणी | | | | | | NATIONAL SAMPLE SURVEY |
| | 1) पाहणीचे क्षेत्रकाम | पाहण्यांची संख्या | 1 | 1 | 2 | No. of Surveys | Field work of survey |
| | 2) निवडलेली खेडी व नागरी विभाग | संख्या | 78 वी फेरी ग्रा. 511<br>ना. 783 | 79 वी फेरी ग्रा. 390<br>ना. 684 | 79 वी फेरी ग्रा. 130<br>ना. 228<br>80 वी फेरी @ | No. | No. of selected villages and Urban blocks |
| | 3) अहवाल लेखन | संख्या | 5 | 8 | 2 | No. | Drafting of reports |
| (ब) | एतदर्थ पाहणी | | | | | | ADHOC SURVEY |
| | 1) पाहणीचे क्षेत्रकाम | पाहण्यांची संख्या | 1 | 0 | # | No. of Surveys | Field work of survey |
| | 2) निवडलेली खेडी व नागरी विभाग | संख्या | 800 | 0<br>- | # | No.<br>* | No. of selected villages and Urban blocks |
| | 3) अहवाल लेखन | संख्या | 0 | 1 | 0 | No. | Drafting of reports |
| (क) | शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष | | | | | | Employees Master Database |
| | 1) आहरण व संवितरण अधिकारी | संख्या | 12,512 | 12,655 | -- | No. | Number of DDOs |
| | 2) कर्मचाऱ्यांची संख्या (गट अ ते इ) | संख्या | 7,31,699 | 7,22,167 | -- | No. | Number of employees (Group A to E) |

@ केंद्रिय रानपा संघटनेकडून घटक संख्या अप्राप्त/ No. of Units not received from NSO

ग्रा-ग्रामीण/ Rural, ना-नागरी/ Urban, आ-आदिवासी/ Tribal, # पाहणीचा विषय अद्याप निश्चित नाही/ Subject of the Survey yet not decided

# ६. मूल्यमापन अभ्यास

६.१ मूल्यमापन हा नियोजन प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग आहे. शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या विकास योजनांचे मूल्यमापन अभ्यास अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत घेण्यात येतात.

मूल्यमापन अभ्यासाचे मुख्य हेतू :

१. योजना / कार्यक्रमात अभिप्रेत असलेली उद्दिष्टे संख्यात्मक व गुणात्मक कितपत साध्य झाली हे पाहणे,
२. लाभधारक किंवा विकास कामे लक्ष्यगटातीलच / निकषांप्रमाणे होते किंवा कसे हे तपासणे,
३. योजने अंतर्गत दिले जाणारे सहाय्य पर्याप्त स्वरूपात आहे काय व वेळेवर दिले गेले काय हे पाहणे,
४. योजनेचा लाभधारकांवर कितपत परिणाम झाला आहे ते तपासणे,
५. योजनेच्या अंमलबजावणीत काय त्रुटी आहेत याचा शोध घेणे हे आहेत.

६.२ मूल्यमापन अभ्यासासाठी विषयांची निवड नियोजन विभागामार्फत करण्यात येते आणि निवडलेले विषय या संचालनालयाला कळविण्यात येतात. संचालनालयातील मूल्यमापन शाखेची दरवर्षी ६ ते ७ विषयांचे मूल्यमापन अभ्यास घेण्याची क्षमता आहे. याशिवाय नामिका सूचीतील बाह्यस्थ संस्थांकडून काही विषयांचे मूल्यमापन अभ्यास करुन घेण्यात येतात.

६.३ राज्य शासनाने दि.२७/०३/२०१३ च्या अधिसूचनेद्वारे या संचालनालयाला राज्यातील सर्व प्रकारच्या सांख्यिकीय कामांसाठी प्रमुख संस्था (नोडल एजन्सी) म्हणून अधिसूचित केले आहे. या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागांना आवश्यकतेनुसार मूल्यमापन अभ्यासाबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

६.४ सन २०२१-२२ मध्ये कृषीपंपधारक व यंत्रमागधारक ग्राहकांना वीजदर सवलत या योजनेचा अहवाल प्रकाशित करण्यात आला.

६.५ सन २०२१-२२ मध्ये अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत खालील योजनांचे मूल्यमापन अभ्यास घेण्यात आले आहेत:

१. अनुसुचित जाती व नवबौद्ध यांच्या मालकीच्या विहीरींवरील कृषीपंपांचे विद्युतीकरण करणे
२. भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना
३. राष्ट्रीय कृषि विकास योजना
४. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजना
५. अंगणवाडी प्रशिक्षण केंद्र व मध्यमस्तर प्रशिक्षण केंद्र यांच्या प्रशिक्षणाच्या परिणामाचे मूल्यमापन योजना

६.६ सन २०२२-२३ मध्ये सन २०२१-२२ मध्ये घेण्यात आलेल्या योजनांच्या मूल्यमापन अभ्यासावरील अहवाल पूर्ण करण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये खालील योजनांचे मूल्यमापन अभ्यास पाहणी घेण्यात येत आहेत.

१. डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना
२. राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत अंशत: ठाणबंद पध्दतीने शेळीपालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे (सर्वसाधारण + अनुसूचित जाती उपयोजना)
३. दीनदयाळ अंतोदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
४. शबरी आदिवासी घरकुल योजना
५. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

६.७ सन २०२३-२४ मध्ये खालील योजनांचे मूल्यमापन अभ्यास घेण्यात येणार आहेत.

१. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना
२. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना
३. राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत राज्यात दूध उत्पादनास चालना देण्यासाठी ६/४/२ दुधाळ संकरीत गायी / म्हशींचे गट वाटप करणे (सर्वसाधारण + अनुसूचित जाती उपयोजना)
४. अल्पसंख्याक बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अपंग शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यामध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान
५. राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत हजार मासंल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुटपालन व्यवसाय सुरु करणे (सर्वसाधारण + अनुसूचित जाती उपयोजना)
६. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

**तक्ता ६.१**

**वित्तीय आवश्यकता**

(रुपये हजारात)

| वर्गीकरण | प्रत्यक्ष खर्च २०२१-२०२२ Actuals 2021-2022 | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२२-२०२३ Budget Estimates 2022-2023 | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total | अनिवार्य खर्च Committed Expenditure | कार्यक्रम खर्च Scheme Expentiture | एकूण Total |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण-** | | | | | | |
| मूल्यमापन अभ्यास | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| एकूण 'अ' स्थूल | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'अ' निव्वळ | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| **(ब) उद्दिष्टवार वर्गीकरण-** | | | | | | |
| वेतन | 39060 | 0 | 39060 | 55133 | 0 | 55133 |
| अतिकालीक भत्ता | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| प्रवास खर्च | 109 | 0 | 109 | 455 | 100 | 555 |
| कार्यालयीन खर्च | 0 | 2 | 2 | 1 | 5660 | 5661 |
| दुरध्वनी, वीज | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 |
| इतर प्रशासकीय खर्च | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सामग्री व पुरवठा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| व्यावसायीक व विशेष सेवा | 0 | 0 | 0 | 0 | 5000 | 5000 |
| प्रकाशने | 0 | 0 | 0 | 0 | 25 | 25 |
| सहायक अनुदान (वेतनेतर) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| संगणक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| यंत्रसामग्री व साधनसामग्री | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कंत्राटी सेवा | 0 | 0 | 0 | 0 | 100 | 100 |
| एकूण 'ब' स्थूल | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'ब' निव्वळ | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| **(क) वित्त व्यवस्थेची साधने-** | | | | | | |
| मागणी क्र. प्रधान शीर्ष | | | | | | |
| ओ -९ ३४५४ | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| एकूण 'क' स्थूल | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |
| वजा वसुली | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकूण 'क' निव्वळ | 39169 | 2 | 39171 | 55591 | 10885 | 66476 |

**TABLE ६.१**
**Financial Requirements**

(Rs. in thousand)

| सुधारित अंदाज २०२२-२०२३ | | | अर्थसंकल्पिय अंदाज २०२३-२०२४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Revised Estimates 2022-2023 | | | Budget Estimates 2023-2024 | | | Classification |
| अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | अनिवार्य खर्च | कार्यक्रम खर्च | एकूण | |
| Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | Committed Expenditure | Scheme Expentiture | Total | |
| (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) | (1) |
| | | | | | | **Activitywise Classification --** |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Evaluation Studies |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Total 'A' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Total 'A' Net |
| | | | | | | **Objectwise Classification --** |
| 51673 | 0 | 51673 | 60646 | 0 | 60646 | Salaries |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Over time allowance |
| 318 | 70 | 388 | 478 | 200 | 678 | Travel expenses |
| 1 | 5094 | 5095 | 1 | 1000 | 1001 | Office expenses |
| 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | Telephone, Electricity |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Other administrative expenses |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Supplies and Material |
| 0 | 4250 | 4250 | 0 | 19600 | 19600 | Professional & Special Services |
| 0 | 18 | 18 | 0 | 40 | 40 | Publication |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Grant in aid (Non salary) |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Computer |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Machinery & Equipments |
| 0 | 90 | 90 | 0 | 1 | 1 | Contractual Services |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Total 'B' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Total 'B' Net |
| | | | | | | **Source of Finance --** |
| | | | | | | Demand No. Major Head |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | O-9 3454 |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Total 'C' Gross |
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | Deduct Recoveries |
| 51994 | 9522 | 61516 | 61127 | 20841 | 81968 | Total 'C' Net |

## तक्ता ६.२ TABLE 6.2

### कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश
### Programme work-load summary

| अ. क्र. | कार्य / बाब वर्णन | कामाच्या मोजमापाचे परिमाण | कामाची प्रगती work progress | | | Unit of Work Measurement | Activity/ Item Description |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2021-22 | 2022-23 | 2023-24 | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1. | अर्थ व सांख्यिकी संचालनालयाद्वारे घेण्यात येणारे मूल्यमापन अभ्यास | (संख्या) | | | 6 | -- | Evaluation studies to be conducted by DES |
| | अ. क्षेत्रकाम | | 3 | 5* | -- | | a) Field work |
| | ब. अहवाल लेखन | | 1 | 5 | -- | | b) Report Writing |
| | क. अहवाल प्रकाशन | | 1 | | -- | | c) Publication of reports |
| 2. | बाह्यस्थ संस्थाद्वारे घेण्यात येणारे मूल्यमापन अभ्यास | (संख्या) | --** | --** | | -- | Evaluation studies to be conducted by empanelled agencies |
| | अ. क्षेत्रकाम | | लागू नाही | लागू नाही | | | a) Field work |
| | ब. अहवाल लेखन | | लागू नाही | लागू नाही | | | b) Report Writing |
| | क. अहवाल प्रकाशन | | लागू नाही | लागू नाही | | | c) Publication of reports |

* मूल्यमापन अभ्यास पाहणीचे क्षेत्रकाम सुरु करण्यात येत आहे.

**नामिका सूचीतील बाह्यस्थ संस्थांचा कालावधी संपुष्टात आला आहे.

## ७. आकडेवारी संस्करण

७.१ संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या गणना व नमुना पाहण्या यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर संकलित होणारी माहीती नोंदविणे, एकत्रित करणे व माहितीचे संस्करण करणे ही कामे इलेक्ट्रॉनिक आकडेवारी संस्करण (इआसं) शाखेत करण्यात येतात. यात (१) संगणक माहिती नोंदणी प्रणाली आराखडा विकसित करणे (२) आराखड्यावर आधारीत आज्ञावली विकसित करणे आणि (३) तयार करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीचे सुचालन करणे इत्यादी कामांचा समावेश होतो.

७.२ संचालनालयाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या संगणकीय प्रणालींचा उपयोग नियोजन विभाग तसेच शासनाचे इतर विभाग यांचेमार्फत सुद्धा केला जातो.

७.३ अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची सर्व संगणकीय प्रणाली (संकेतस्थळ, आज्ञावली व माहीती) राज्य माहिती केंद्रस्थित Server वरून Cloud server वर सन २०१९-२० मध्ये स्थानांतरीत करण्यात आली आहे.

७.४ सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये करण्यात आलेल्या व सन २०२३-२४ मध्ये करावयाच्या कामांचा विषय निहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.

### राष्ट्रीय नमुना पाहणी

७.४.१ सन २०२१-२२ मध्ये रानपा ७८ व्या फेरी करिता क्षेत्रकामांचा आढावा व सनियंत्रण आज्ञावली अद्ययावत करण्यात आली. रानपा ७५ वी फेरी पत्रक १.० करिता तक्तीकरणाचे काम करण्यात आले.

७.४.२ सन २०२२-२३ मध्ये रानपा क्षेत्रकाम आढावा व सनियंत्रण आज्ञावलीचे सुचालन व रानपा फेरी क्र. ७९ व्या फेरीकरिता अद्ययावतीकरण करण्यात आले.

७.४.३ सन २०२३-२४ मध्ये रानपा क्षेत्रकाम आढावा व सनियंत्रण आज्ञावली सुचालन व अद्ययावतीकरण करण्यात येईल.

### वार्षिक उद्योग पाहणी

७.४.४ सन २०२१-२२ मध्ये वाउपा २०१७-१८ च्या राज्य व केंद्र एकत्रित नमुन्यावर तक्तीकरण करण्यात आले. वाउपा २०१३-१४ राज्य नमुन्यावर आधारित वैधतीकरण करण्यात आले. वाऊपा क्षेत्रकामांच्या सनियंत्रण व माहिती नोंदणी करिता आज्ञावली विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले.

७.४.५ सन २०२२-२३ मध्ये वाउपा क्षेत्रकामांच्या सनियंत्रणाकरिता व राज्य नमुन्याच्या माहिती नोंदणीकरीता आज्ञावली विकसित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. सन २०१३-१४, २०१४-१५ व २०१८-१९ च्या राज्य व केंद्र माहितीवर आधारीत तक्तीकरण करण्यात आले.

७.४.६ सन २०२३-२४ मध्ये वाउपा क्षेत्रकामांच्या सनियंत्रण व माहिती नोंदणी करिता विकसित आज्ञावलीचे सुचालन व अद्ययावतीकरण करण्यात येईल.

### औद्योगिक उत्पादन निर्देशांक

७.४.७ सन २०२१-२२ मध्ये दरमहा औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करण्याकरिता माहिती नोंदणी प्रणाली विकसित करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. यासोबतच Dashboard विकसीत करणे, मासिक अहवाल उपलब्ध करुन देणे, ई-मेल व sms reminder schedule करणे, Mining क्षेत्राची माहिती अद्ययावत करण्याची सुविधा देणे, प्रणालीद्वारे बुलेटिनची निर्मिती व प्रकाशन इत्यादी कामे करण्यात आली.

७.४.८ सन २०२२-२३ मध्ये प्रणालीचे सुचालन व अद्ययावतीकरण, परिगणना व निर्देशांक प्रकाशित करणे, इ. कामे करण्यात आली.

७.४.९ सन २०२३-२४ मध्ये प्रणालीचे सुचालन, अद्ययावतीकरण करण्यात येईल.

**ग्राहक किंमती निर्देशांक**

७.४.१० सन २०२१-२२ मध्ये ग्राहक किंमती निर्देशांक प्रणालीचे (पायाभूत वर्ष २००३) सुचालन करण्यात आले.

